**L. A. BILL No. XXXVII OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.**

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७८ चा महा. २०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक

व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि म्हणून, त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता; २०२६ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहतराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ जून २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,- १९७८ चा महा. २०.

(१) खंड (अ-१) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(अ-१) "केंद्रीय अधिनियम" याचा अर्थ, विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) : व्ही बी - जी आर ए एम जी (विकसित भारत - जी राम जी) अधिनियम, २०२५, असा आहे; " ; २०२५ चा ३६.

(२) खंड (अ-२) वगळण्यात येईल ;

(३) खंड (इ-२) वगळण्यात येईल ;

(४) खंड (जे) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(जे-१) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे; " ;

(५) खंड (ल) ऐवजी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(ल) "राज्य परिषद" याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद, असा आहे; " ;

(६) खंड (ल) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

(ल-१) "राज्य स्तरावरील सुकाणू समिती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ४-अ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली राज्यस्तरीय सुकाणू समिती, असा आहे; " ;

(७) खंड (म-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(म-२) "महाराष्ट्र राज्य व्ही बी - जी राम जी निधी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १२-अ अन्वये घटित केलेला रोजगार व आजीविका हमी अभियानाकरिता महाराष्ट्र राज्य विकसित भारत हमी निधी योजना, असा आहे;".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कलम ३ च्या पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी, "कलम ५ च्या पोट-कलम (१)" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा" या मजकुराऐवजी, "कलम ५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीव्यतिरिक्त" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३-अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३-अ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "लोकभाषेतील वृत्तपत्र असेल" या मजकुरानंतर, "तसेच राज्य शासन, असा सारांश राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा कोणत्याही नियुक्त डिजिटल प्लॅटफॉर्मवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जनतेला उपलब्ध करून देईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३-क ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३-क मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कलम ६" या मजकुराऐवजी, "कलम १०" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईलः-

"परंतु, वेतन दराची अतिरिक्त रक्कम, विविध प्रकारच्या अकुशल अंगमेहनतीच्या कामांसाठी आणि विविध क्षेत्रांसाठी राज्य शासन अधिसूचित करू शकेल.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये,-

(एक) पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) समासटिपेतील मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः-

"राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मध्ये कलम ४-अ समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

राज्यस्तरीय सुकाणू समिती.

"**४-अ.** (१) राज्य शासन, योजनेच्या अंमलबजावणीचे प्रचालनात्मक मार्गदर्शन, समन्वयन आणि सनियंत्रण यांकरिता एक राज्यस्तरीय सुकाणू समिती घटित करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्षपद, राज्याचा मुख्य सचिव किंवा राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित केलेला अपर मुख्य सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी भूषवील आणि ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेलः-

(अ) संबंधित विभागाचा प्रधान सचिव किंवा सचिव;

(ब) संचालक किंवा आयुक्त (योजनेचा प्रभारी)

(क) राज्य शासनाच्या संबंधित विभागांचे प्रधान सचिव किंवा सचिव;

(ड) राज्य शासन निर्धारित करील, इतके विषय तज्ज्ञ;

(ई) तंत्रज्ञान किंवा संशोधन संस्थांचे प्रतिनिधी; आणि

(फ) ग्राम विकास विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी नामनिर्देशित केलेला एक सदस्य.

(३) राज्यस्तरीय सुकाणू समिती-

(अ) इतर कार्यक्रमांबरोबर राज्यव्यापी नियोजन आणि अभिसरण यांचे पर्यवेक्षण करील;

(ब) जिल्हा कामगिरीचा आढावा घेईल आणि एकत्रित राज्य योजनेच्या तयारीची वेळेवर सुनिश्चिती करील;

(क) राष्ट्रीय स्तरावरील सुकाणू समितीसोबत समन्वय साधील आणि तिच्याकडून दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी करील;

(ड) डिजिटल प्रणाली, सनियंत्रण व्यवस्था यांस साहाय्य करील आणि राज्यस्तरावरील सुधारणांची प्रक्रिया करील; आणि

(ई) राज्य शासनाद्वारे तिला नेमून देण्यात येतील, अशी अन्य कार्ये पार पाडील.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १२-अ ऐवजी दाखल करणे.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२-अ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईलः-

महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधी.

"**१२-अ.** (१) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधी, या नावाने एक निधी घटित करील. अशाप्रकारचा निधी हा, कलम १२ अन्वये घटित केलेल्या रोजगार हमी निधीचा भाग असणार नाही.

(२) केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३० अन्वये मिळालेली कोणतीही रक्कम आणि केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (७) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य शासनाचे अंशदान हे, महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(३) महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधीमध्ये जमा असलेली रक्कम या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन राहून ग्रामीण क्षेत्रांमध्ये खर्च करण्यात येईल.

(४) महाराष्ट्राच्या व्ही बी-जी राम जी राज्य निधीचे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्राधिकरणाकडून राज्य शासनाच्या वतीने धारण करण्यात येईल व त्याचे व्यवस्थापन करण्यात येईल.

(५) केंद्रीय अधिनियमाअन्वये योजनेअंतर्गत हाती घेतलेले काम पूर्ण झाल्यावर, जर त्या पूर्ण झालेल्या कामाचे अधिक कुशल काम करण्यासाठी, उक्त कामाच्या तांत्रिक गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी किंवा मूल्यवर्धन करण्यासाठी काम हाती घेणे आवश्यक असेल तर, राज्य शासन आवश्यकतेनुसार पूरक निधी पुरवील किंवा अभिसरणाची तरतूद करील.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४-क ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४-क मधील,

(एक) "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "दहा हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) "केंद्रीय अधिनियमाच्या कलम २७" या मजकुराऐवजी, "केंद्रीय अधिनियमाच्या कलम २९" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१०.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल त्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येतीलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो, काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

**११.** (१) महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २०२६ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. ८.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना, नियम किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ ( १९७८ चा महा. २० ) ( यात यापुढे ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम" असा केला आहे ) हा, राज्याच्या ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ व्यक्ती स्वतः होऊन तयार असतील अशा सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतुदी करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमाअन्वये विविध रोजगार हमी योजना राज्यात यशस्वीरीत्या राबविण्यात आल्या आहेत.

**२.** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या धर्तीवर, ग्रामीण क्षेत्रांमध्ये अकुशल रोजगाराची हमी देणारा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ ( २००५ चा ४२ ) हा संसदेद्वारे अधिनियमित करण्यात आला आहे. मनरेगा अधिनियमाच्या कलम २८ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अशी तरतूद आहे की, जेथे ग्रामीण कुटुंबाला रोजगार हमी देण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असा राज्य अधिनियम अस्तित्वात असेल किंवा अधिनियमित केला गेला असेल, ज्या अंतर्गत रोजगाराच्या अटी या अधिनियमांतर्गत हमी दिलेल्या अटींपेक्षा कमी दर्जाच्या नसतील, तेथे राज्य शासनाला स्वतःचा अधिनियम राबविण्याचा पर्याय असेल. ग्रामीण क्षेत्रांतील अकुशल कामाच्या रोजगार हमीबाबत मनरेगा अधिनियमातील तरतुदींच्या तुलनेत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमामध्ये अधिक फायदेशीर तरतुदी समाविष्ट आहेत. म्हणून, मनरेगा अधिनियम अधिनियमित झाल्यानंतरही, उक्त कलम २८ नुसार सुयोग्य सुधारणा करून तो मनरेगा अधिनियमाशी सुसंगत केल्यानंतर, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम राज्यात अंमलात असण्याचे चालू राहिले.

**३.** विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण): व्ही बी- जी आर ए एम जी ( विकसित भारत - जी राम जी ) अधिनियम, २०२५ ( २०२५ चा ३६ ) हा संसदेद्वारे अधिनियमित करण्यात आला असून त्याच्या कलम ३७ मध्ये मनरेगा अधिनियम निरसित करण्याची तरतूद आहे. अधिक लाभदायी राज्य अधिनियम लागू असणे चालू ठेवण्याबाबत व्ही बी- जी राम जी अधिनियमाच्या कलम ३० मध्ये मनरेगा अधिनियमाच्या कलम २८ मधील तरतुदींसारख्याच तरतुदी समाविष्ट आहेत. म्हणून, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम अंमलात असण्याचे चालू राहण्यासाठी, उक्त कलम ३० च्या तरतुदींनुसार तो व्ही बी- जी राम जी अधिनियमाशी सुसंगत करणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात सुधारणा करणे आवश्यक होते.

**४.** राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र रोजगार हमी ( सुधारणा ) अध्यादेश, २०२६ ( २०२६ चा महा. अध्या. ८ ), हा प्रख्यापित केला होता.

**५.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**भरत गोगावले,**
रोजगार हमी योजना मंत्री.

मुंबई,
दिनांक २२ जून २०२६.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः-

**खंड ७.—** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ ( १९७८ चा महा. २० ) यामध्ये नवीन कलम ४-अ समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, राज्यस्तरीय सुकाणू समिती घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८.—** अधिनियमाच्या कलम १२-अ ऐवजी नवीन कलम दाखल करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,-

(एक) पोट-कलम ( ३ ) अन्वये, महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधीमध्ये जमा असलेली रक्कम ज्या रीतीने, शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन राहून खर्च करण्यात येईल, ती रीत, त्या शर्ती व मर्यादा नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे;

(दोन) पोट-कलम ( ४ ) अन्वये, महाराष्ट्र राज्य व्ही बी- जी राम जी निधीचे ज्या रीतीने व ज्या प्राधिकरणाकडून प्रशासन करण्यात येईल ती रीत व ते प्राधिकरण नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०.—** या खंडान्वये, उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना जी उद्‌भवेल अशी कोणतीही अडचण दूर करण्यासाठी, **शासकीय राजपत्राद्वारे** आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

महाराष्ट्र व्ही बी-जी राम जी राज्य निधी स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ ( १९७८ चा महा. २० ) याच्या कलम १२-अ ऐवजी बदली कलम दाखल करण्यासाठी विधेयकाच्या खंड ८ मध्ये तरतूद केली आहे. उक्त निधीतून, केंद्र सरकारच्या तसेच राज्य शासनाच्या अंशदानातून राज्यामध्ये विविध रोजगार हमी योजनांची अंमलबजावणी करण्यात येईल. म्हणून, हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून सध्या अंदाजित केलेल्या रुपये ९२५२.३२ कोटी इतक्या आवर्ती खर्चाचा, त्यात अंतर्भाव असेल.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

(शा.म.मु.) एचबी ५८०-३ (१०४५–६-२०२६)

## सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ३७ महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

### [महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यातील उतारे]

### (सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.)

१. ** ** ** ** व्याख्या.

२. संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,

(अ) ** ** ** **

(अ-अ१) व (अ-अ२) ** ** **

(अ-१) "केंद्रीय अधिनियम" याचा अर्थ, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५, असा आहे;

(अ-२) "केंद्रीय परिषद" याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली, केंद्रीय रोजगार हमी परिषद, असा आहे;

(ब) ** ** ** **

(ब-१) ते (ब-३) ** ** ** **

(ड) व (ई) ** ** ** **

(इ-अ१) व (इ-अ२) ** ** **

(इ-१) ** ** ** **

(इ-२) "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र" याचा अर्थ, कलम १२-अ खाली घटित केलेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र असा आहे;

(फ) ते (के) ** ** ** **

(ल) "राज्य परिषद" याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद, असा आहे;

(म) ते (ओ) ** ** ** **

कुटुंबांना ग्रामीण रोजगाराची हमी

३. (१) ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतःहून तयार असलेल्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना काम मिळण्याचा हक्क असेल. राज्य शासन, या अधिनियमान्वये तयार केलेल्या योजनेनुसार, केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये हमी दिल्याप्रमाणे, ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वतःहून तयार असतील अशा प्रत्येक कुटुंबाला काम देईल.

(२) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी योजनेअंतर्गत कुटुंबातील प्रत्येक प्रौढ सदस्याला काम मिळण्यासाठी तरतुदी करील.

(३) व (४) ** ** ** **

ग्रामीण क्षेत्रांसाठी रोजगार हमी योजना

**३-अ.** (१) ** ** ** **

(२) राज्य शासन, त्याने तयार केलेली योजना अंमलात असण्याचे चालू असेतोपर्यंत त्या योजनेचा सारांश कमीतकमी दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करील, त्यापैकी एक वृत्तपत्र हे ज्या क्षेत्राला किंवा क्षेत्रांना अशी योजना लागू असेल अशा क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये खप असलेले स्थानिक लोकभाषेतील वृत्तपत्र असेल.

(३) व (४) ** ** ** **

**३-ब.** ** ** ** **

वेतन दर.

**३-क.** (१) केंद्रीय अधिनियमाच्या कलम ६ अन्वये केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेला वेतन दर हा, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वेतन दर असेल.

(२) ** ** ** **

**३-ड.** ते **३-फ.** ** ** ** **

राज्य रोजगार हमी परिषद.

**४.** (१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे नियमित संनियंत्रण व पुनरीक्षण करण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, "महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद" या नावाने ओळखली जाणारी एक राज्य परिषद घटित करील आणि या परिषदेचा एक अध्यक्ष असेल व राज्य शासन निश्चित करील इतके शासकीय सदस्य तसेच, पंचायत राज संस्था, कामगार संघटना व लाभवंचित गट यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले पंधरापेक्षा जास्त नसतील इतके अशासकीय सदस्य असतील :

परंतु असे की, या पोट-कलमान्वये नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य महिला असतील :

परंतु आणखी असे की, या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक वर्ग यांतील असतील.

(२) ते (५) ** ** ** **

**५.** ते **१२.** ** ** ** **

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र.

**१२-अ.** (१) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम २१ अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र म्हणून संबोधण्यात येणारा एक निधी घटित करील. अशाप्रकारचा निधी हा, कलम १२ अन्वये घटित केलेल्या रोजगार हमी निधीचा भाग असणार नाही.

(२) केंद्रीय अधिनियमाच्या कलम २८ अन्वये मिळालेली कोणतीही रक्कम आणि केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य शासनाचे अंशदान हे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र यामध्ये जमा करण्यात येईल.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र यामध्ये जमा असलेली रक्कम या अधिनियमाच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून खर्च करण्यात येईल.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्राधिकरणाकडून राज्य शासनाच्या वतीने धारण करण्यात येईल व त्याचे व्यवस्थापन करण्यात येईल.

(५) केंद्रीय अधिनियमाखालील योजने अंतर्गत हाती घेतलेले काम पूर्ण झाल्यावर, जर उक्त कामाचा तांत्रिक दर्जावाढ किंवा त्याचे मूल्यवर्धन करण्यासाठी त्या पूर्ण झालेल्या कामाचे आणखी कुशल काम हाती घेणे आवश्यक असेल तर, राज्य शासनास ते काम पूर्ण करण्यासाठी आवश्यकता किंवा तरतूद म्हणून पूरक निधीची तरतूद करता येईल.

**१२-ब.** ते **१२-इ.** ** ** ** **

**१३.**

**१३-अ.**

**१४.**

**१४अ.** जो कोणी, कलम ९ खालील शास्ती खेरीज, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, दोष सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल, आणि संबंधित सेवा नियमांनुसार व केंद्रीय अधिनियमाच्या कलम २७ अन्वये केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईसदेखील पात्र असेल. शास्ती

**१५.** ते **१७.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.]**

**[महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. भरत गोगावले,**
शालेय शिक्षण मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई